## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२६ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार विनायक बाळू जावीर, रा. खंजीरे मळा, इचलकरंजी, ता.हातकंणगले, जि. कोल्हापूर यांनी त्यांच्या मालकीचे जप्त असलेले ०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे धणेमणीमाळ सुप्रतनाम्यावर परत मिळण्याकरीता सादर केला आहे.

०२. अर्जदार यांनी सादर केले आहे की, अर्जदार हे इचलकरंजी येथील रहिवाशी असून दिनांक ०८/०८/२०२५ रोजी अर्जदाराची आई, भाऊ, भाउजय, पुतणी असे अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता गुलबर्गा एक्सप्रेसने रात्री १०.१० वाजताच्या सुमारास अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथे उतरले. रात्री १०.३० वाजताच्या सुमारास अक्कलकोट येथे जाण्याकरीता अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथील बस थांब्यावरुन बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात इसमाने त्यांच्या आईच्या गळयातील ८० धणेमणी, एक मोठा मणी व दोन बारीक मणी असलेली ०५ ग्रॅम वजनाची धणेमणीमाळ चोरल्याचे लक्षात आले. अर्जदाराने सदर धणेमणीमाळ त्यांच्या आईला भेट म्हणून दिली होती. सदर धणेमणीमाळतील ३२ धणेमणी, एक मोठी मणी हे अर्जदाराने दिनांक २०/०६/२०२२ रोजी तुकाराम व्ही.कुर्डेकर, इचलकरंजी यांच्या दुकानातून तर ५० धणेमणी हे दिनांक ०६/०८/२०२३ रोजी शांताराम निवृत्ती हावळ गुजरी, कोल्हापूर यांच्या दुकानातून खरेदी केले होते. सदर धणेमणीमाळाचे अंदाजे वजन ०५ ग्रॅम होते. अर्जदाराच्या आईने अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे सदर चोरीबाबत रितसर फिर्याद दिली व त्याप्रमाणे अक्कलकोट दक्षिण पोलीसांनी गु.र.क्र. ४०७/२०२५, भा.न्या.सं. कलम ३०३(२) प्रमाणे नोंदविला व गुन्हयाचा तपास करुन आरोपीकडून चोरीस गेलेला सोन्याचा दागिना जप्त केला आहे. सदरचा मुद्देमाल हा अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या वापराकरीता खरेदी केला असल्याने सदर दागिन्याचा ताबा न मिळाल्यास तो त्यांच्या आईला वापरता येणार नाही. त्यामुळे, अर्जदार यांना सदर सोन्याचा दागिना सुप्रतनाम्यावर तात्पुरते ताब्यात देण्यात यावेत, अशी विनंती केली.

०३. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ०५ नुसार सादर केले व सदर गुन्हयातील ०५ वजनाची सोन्यासारखे दिसणारे पिवळया धातुचे धणेमणी माळ जप्त केल्याचे व पोलीस ठाणे येथे जमा केल्याचे नमूद केले आहे. तसेच जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे परत देण्यास त्यांची काही हरकत नाही असे नमूद केले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी देखील निशाणी ०१ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन जप्त मुद्देमाल अर्जदारास परत करण्यास नाहरकत दर्शविली आहे.

०४. अर्जाचे, उत्तरांचे आणि दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदाराने दाखल केलेल्या आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रतीचे अवलोकन करता अर्जदार हा खंजिरे मळा, इचलकरंजी येथील कायमचा रहिवाशी असल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या आईने दिनांक

०९/०५/२०२५ रोजी पोलीस ठाणे, अक्कलकोट दक्षिण येथे सोन्याची धणेमणीमाळ चोरीस गेल्याबद्दल अपराध क्र.४०७/२०२५ दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदर धणेमणीमाळ पोलीसांनी जप्त केले आहे. अर्जदाराने अपराध क्र.४०७/२०२५ च्या एफ.आर.आय.ची प्रत दाखल केली असून त्यामधील तक्रारदार म्हणून अर्जदार यांच्या आईच्या नावाचा उल्लेख आढळून येतो. अर्जदाराने जप्त मुद्देमाल त्याच्या मालकीची आहे याबाबत तुकाराम व्ही. कुर्डेकर व शांताराम निवृत्ती हावळ यांच्याकडील पावत्यांच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल केल्या आहेत. त्यांचे अवलोकन करता अर्जदाराने एकूण ८३ धणेमणीमाळ खरेदी केल्याचे दिसते. अर्जदाराने आपल्या कथनाच्या पुष्टीकरणाकरीता त्यांची आई सुनिता बाळू जावीर यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी ०६ अन्वये दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रात अर्जदार यांची आई सुनिता जावीर यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हा त्यांचा मुलगा आहे. त्यांच्या गळयातील सोन्याची धणेमणीमाळ अक्कलकोट स्टेशन येथे चोरीस गेली होती व त्याबाबत त्यांनी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे येथे रितसर फिर्याद दिली आहे. अर्जदाराने सदरचे सोन्याचे धणेमणीमाळ त्यांना भेट म्हणून दिली होती व ती अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्यांची काहीएक हरकत नाही. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द तपास कार्य पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल केल्याबाबत निशाणी क्र.०५ च्या उत्तरातून बोध होत नाही आणि त्याबाबत सरकारी अभियोक्ता यांनी सुध्दा कोणतीच माहिती न्यायालयास पुरवली नाही. तपासी अधिकारी व सरकारी अभियोक्ता यांनी जप्त मुद्देमाल अर्जदारास सुप्रतनाम्यावर ताब्यात देण्याविषयी नाहरकत दर्शविली असल्याने अर्जदार यांना जप्त मुद्देमाल हा तात्पूरता ताब्यात देणे न्यायोचित होईल. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जप्त केलेल्या दागिन्याबाबत हक्क प्रस्थापीत केलेला नाही व अर्जदाराच्या हक्काला आक्षेप वा ऊजर नोंदविलेला नाही. अर्जदार यांनी सदर जप्त दागिन्यावर त्यांचा प्राथमिकरीत्या हक्क सिद्ध केल्याने अर्जदार हे अंतरीमरित्या सदर दागिन्याच्या ताब्यास पात्र ठरतात. याप्रकारे अर्जदाराचा अर्ज खालील आदेशाप्रमाणे निकाली काढण्यात येतो :-

## आ दे श

१. अर्जदाराचा अर्ज खर्चाच्या आदेशाविना मंजूर करणत येते.

२. अर्जदार विनायक बाळू जावीर, रा. खंजीरे मळा, इचलकरंजी, ता.हातकंणगले, जि. कोल्हापूर हे त्यांच्या मालकीची जप्त असलेली ०५ ग्रॅम वजनाची धणेमणीमाळ हे सुप्रतनाम्यावर अंतरीमरित्या मिळण्यास पात्र आहेत व ती धणेमणीमाळ अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावी.

३. अर्जदार विनायक बाळू जावीर, रा. खंजीरे मळा, इचलकरंजी, ता.हातकंणगले, जि. कोल्हापूर यांनी जप्त मुद्देमाल मिळाल्यानंतर

त्याच्या रंगात कुठलाही बदल करणार नाही, ते कुणालाही हस्तांतरीत करणार नाही, त्याच्या मुळ स्वरुपात बदल करणार नाही व आदेशान्वये ते साहित्य न्यायालयासमक्ष प्रस्तुत करेल अशी हमी घेवून त्याबाबत हमीपत्र (Indemnity Bond) रुपये ७५,०००/- व त्या रक्कमेचा जामीनदार सुद्धा सादर करेल.

४. अर्जदार हा जप्त असलेल्या मुद्देमालाचे सर्व बाजुंनी छायाचित्र स्वखर्चाने गैरअर्जदार यांना काढून देईल व गैरअर्जदाराने ते दोषारोपपत्रासोबत दाखल करावे व त्या साहित्याचे अधिकृत सोनार यांच्या कडून मोजमाप करुन तसा अहवाल व जप्त साहित्याचे कॅरेट/शुध्दता, वजन आणि किंमत घेईल व ते दोषारोपपत्राबरोबर दाखल करेल. त्या बाबतचा खर्च हा अर्जदार सहन करेल.

५. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येतो आणि प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज हे दोषारोपपत्राबरोबर जोडण्यात यावे.

MUKUL MUKUND KALYANKAR
Digitally signed by MUKUL MUKUND KALYANKAR
Date: 2026.03.20 13:04:44 +0530

(एम.एम. कल्याणकर)
न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी)
न्यायालय क्र.१, अक्कलकोट.

दिनांक :- १७.०३.२०२६.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri (Grade-III). |
| Court | : | C.J.J.D. and J.M.F.C., Akkalkot. |
| Date | : | 17.03.2026 |
| Judgment / Order signed by P. O. on | : | 17.03.2026 |
| Judgment / Order uploaded on | : | 17.03.2026 |